२९/५०. ४४

## परिशिष्ठ क्रमांक १६

# प्रक्रिया करणाऱ्याची अनुज्ञप्ती मिळणेकरिता अर्ज केलेल्या इसमाने करून देण्याचा करारनाम्याचा नमुना

मा.सभापती,
कृषि उत्पन्न बाजार समिती, ----------------------------------------

करारनामा करून देणार मी - आम्ही

नांव ---------------------------------------------------------------------------------------------------- वय ----------

व्यवसायाचा पत्ता --------------------------------------------- राहणार ----------------------------------------------------------

**आपल्याशी आज रोजी करारनामा करून देतो की,**

१) महाराष्ट्र शेतीच्या उत्पन्नाची खरेदी-विक्री (नियम) अधिनियम, १९६३ त्याखालील नियम, उपविधी व त्याखालील उपनियम मी / आम्ही संपूर्णपणे वाचले असून ते मला / आम्हास पूर्णपणे समजले आहेत व त्याप्रमाणे व त्यात पुढे वेळोवेळी होणाऱ्या दुरूस्त्यांप्रमाणे तसेच बाजार समितीचे झालेले व पुढे होणारे ठराव, हुकुम याप्रमाणे मी / आम्ही वागण्याचे कबूल करतो.

२) वरील अधिनियम, नियम, उपविधी व त्याखालील उपनियम तसेच बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशी सर्व प्रपत्रे, नोंदवह्या मी आम्ही आवश्यक ती माहित अद्यावत लिहून ठेवीन / ठेवू. तसेच बाजार समितीस हवी असलेली माहिती वेळोवेळी फर्माविण्यात येईल, अशा नमुन्यात पुरविन / पुरवू व ही कागदपत्रे योग्य ते अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास तपासणीसाठी उपलब्ध करून देईन / देऊ व तपासणीकामी मदत करीन / करू.

३) बाजार क्षेत्राबाहेरून प्रक्रिया करणेसाठी आणलेला माल ठरवून दिलेल्या मुदतीत प्रक्रिया न केल्यास त्यावरील फी ची रक्कम मी/आम्ही भरणा करीन/करू. तसेच वरील अधिनियम, नियम व उपविधी व त्याखालील उपनियमान्वव द्यावयाच्या सर्व रकमा मी/आम्ही बाजार समितीकडे वेळचेवेळी संपूर्णपणे भरणा करीन/करू. बाजार समितीने मागणी केल्यास रोख अगर अन्य तऱ्हेची जामिनकीही देईन / देऊ.

४) प्रक्रिया करणेसाठी आलेल्या/आणलेल्या मालात कोणत्याही प्रकारची भेसळ करणार नाही.

५) मी/आम्ही व माझे/आमचे वतीने अन्य इसमांनी केलेल्या सर्व कृत्याबद्दल संपूर्णपणे जबाबदार राहीन/राहू.

६) बाजार समिती देणे असलेल्या फी व अन्य रकमा देण्यात चुकवाचुकव करणाऱ्यांशी तसेच अनधिकृत इसमांशी मी/आम्ही कोणत्याही प्रकारचे व्यवहार करणार नाही व अशा इसमांविरूद्ध कायदेशीर उपाययोजना करण्यास बाजार समितीस सहकार्य करीन/करू.

७) बाजार समितीशी मी/आम्ही नेहमी सहकार्याचे धोरण ठेवीन/ठेवू. बाजार समिती वेळोवेळी फर्मावेल अशा रितीने आमचे कामकाज करीन/करू. बाजारातील कोणत्याही कामकाजात अडथळा येईल अगर चालू कामकाज बंद पडेल असे वर्तन करणार नाही. तसेच मी/आम्ही व्यवसाय करीत असलेल्या बाजाराची प्रतिष्ठा व लौकिक अधिकाधिक वाढेल अशा पद्धतीने मी/आम्ही कामकाज करीन/करू.

आमचे समक्ष सही केली -

(१) सही ---------------------------------------- सही
नाव ----------------------------------------
पत्ता ---------------------------------------- दिनांक

(२) सही ----------------------------------------
नांव ----------------------------------------
पत्ता ----------------------------------------